**नि.फौ.के. नं. ११५/२०२५**
**महाराष्ट्र शासन वि. शंकर**
**निशाण क्र. १७**

**(प्रस्तुत प्रकरणातील आरोपी हा न्यायालयीन कोठडीमध्ये आहे. सदर आरोपीस रत्नागिरी मध्यवर्ती कारागृह यांचेकडुन व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे हजर करण्यात आले. सदर व्हीडीओ कॉलची आवाज प्रेक्षपणाचा दर्जा तपासुन पाहण्यात आला असुन तो चांगला आहे. सदर आरोपी व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे हजर असताना त्याचेसमक्ष साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात येत आहे.**

**सबब, सदर साक्षीदाराची साक्ष खालील प्रमाणे नोंदविण्यात येत आहे.)**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०४ यांचा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – संदेश दत्ताराम कापडी,
**वय –** ५७ वर्षे, **व्यवसाय** – व्यवसाय,
**राहणार –** कोंड असुर्डे, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून –**

**०१**. माझे 'साईराज कोल्ड्रीक्स' नावाचे दुकान असुन ते एस.टी. स्टँड शेजारी, सोनवी चौक, संगमेश्वर येथे आहे. सदरचे दुकान मी सकाळी ०७:०० वाजता उघडुन रात्री १०:०० वाजता बंद करतो.

**०२**. दिनांक ०९/१०/२०२५ रोजी मी नेहमीप्रमाणे सकाळी ०७:०० वाजता माझ्या दुकानाकडे आलो होतो. त्यावेळी माझ्या दुकानाचे शटर उघडलेले व दोन कुलुपे तोडलेली दिसली. आतमध्ये गेल्यानंतर मी पाहिले की, दुकानातील फ्रिज उघडलेला होता व काऊंटर विस्कटलेले होते. माझ्या दुकानाच्या शेजारी असलेले राजेश आंबवकर

यांचे 'दत्तकृपा मोबाईल शॉपी' हे दुकान देखील उघडलेले असल्याचे मला दिसुन आले. तेथे देखील चोरी झाली होती.

**०३**. त्यानंतर, मी पोलीस ठाण्यात कल्पना दिली. राजेश आंबवकर यांना चोरी झाल्याचे कोणीतरी कळविले होते. त्यामुळे, ते त्यांच्या दुकानाकडे आले होते. त्यांनी देखील पोलीसांना चोरी झालेबाबत कल्पना दिली. त्यानंतर पोलीसांनी माझ्या दुकानामध्ये येवुन माझ्या दुकानातील सी.सी.टी.व्ही. फुटेज पाहिले. सदर सी.सी.टी.व्ही. फुटेजमध्ये आज रोजी न्यायालयामध्ये व्ही. सी. वरुन दिसत असलेला आरोपी – साळुंखे/पाटील हा दुकानात जात असताना व दुकानातुन बाहेर येत असताना त्यामध्ये दिसुन आला.

**०४**. पोलीसांना मी सदरचे सी.सी.टी.व्ही. फुटेज दिले होते. ते सी.सी.टी.व्ही. फुटेज मला दाखविल्यास मी ओळखु शकतो.

**अभियोगपक्षातर्फे सी.सी.टी.व्ही. फुटेज हजर करणेबाबत तपासीक अधिकारी यांना आदेश होणेबाबत निशाणी क्रमांक १८ कडे अर्ज दिल्याने सदर अर्जावरील अंतिम आदेश व पुढील आदेशापर्यंत सदर साक्षीदाराचा उर्वरीत सरतपास तहकुब.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.02.12 17:58:04 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**
न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,
जि. रत्नागिरी.

दिनांक १२/०२/२०२६
स्थळः देवरुख

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 12/02/2026 |
| Evidence signed by PO. on | :- | 12/02/2026 |
| Evidence uploaded on | :- | 12/02/2026 |